(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण


४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.


जावक क्र.मजीप्रा/सस/२००१/बैठक ९२/आ.४/९४३ दिनांक : २७/३/२००२

**विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९२ व्या बैठकीचे इतिवृत्त**

दिनांक २७/३/२००२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९२ व्या बैठकीचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता देण्यात यावी ही विनंती.

२७/३

**(राजेंद्र सगणे )**
सदस्य सचिव

**मा.मंत्री, गा.वि. पा.पु.व स्व.**
**तथा म.जी.प्रा. चे अध्यक्ष**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | ४८२६२.४० | ४५९४६.२२ |

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९२ व्या बैठकीचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९२ वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे **पदसिध्द अध्यक्ष**, मा.ना.श्री.आर.आर.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७/३/२००२ रोजी संपन्न झाली या **बैठकीस** प्राधिकरणाचे खालील सदस्य तसेच अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.आर.आर.पाटील, मा.मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष
२) श्रीमती सुलेखाताई कुंभारे, मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाच्या पदसिध्द उपाध्यक्षा
३) श्री.बी.सी.खटुआ, सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय ,मुंबई
४) श्री.एम.एस.हुसैन, सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई
५) श्री.विश्वासराव धुमाळ, सचिव, उद्योग व उर्जा ,मंत्रालय, मुंबई
६) श्री. रा.रा.जोशी, उप सचिव ( सचिव ,सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे प्रतिनिधी ) मंत्रालय, मुंबई
७) श्री. राजेंद्र सगणे, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.अ.बा.सावंत, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन,नवी मुंबई
२) श्री.शेखर गायकवाड, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई
३) श्री.व्यंकट कल्याणकर, अधीक्षक अभियंता (समन्वय) म.जी.प्रा. मुंबई

मा.मंत्री, ग्राम विकास पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचे परवानगीने सभेस सुरुवात झाली .

**कार्यक्रम बाब क्र.१ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९१ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे**

९१व्या सभेच्या इतिवृत्ता बाबत सर्वसाधारणपणे चर्चा करण्यात येऊन इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९१ व्या सभेतील बाबींवर करण्यात आलेली कृती**

या अनुषंगाने सर्वसाधारणपणे चर्चा करण्यात येऊन कार्यवाही बाबत ज्या बाबी नमुद करण्यात आल्या आहेत त्या सर्वकष नसल्याने याबाबत पुन्हा पुढील बैठकीमध्ये अद्ययावत कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात यावा . असे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.३ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सुधारित अंदाजपत्रक सन २००१-२००२ व अंदाजपत्रक २००२-२००३**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००१-२००२ च्या सुधारित अंदाजपत्रकावर व सन २००२-२००३ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर सर्वसाधारण चर्चा करण्यात येऊन सन २००१-२००२ या वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक तसेच सन २००२-२००३ या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्रस्तावानुसार मान्य करण्यात आले. त्याचा ढोबळ मानाने तपशिल खालील प्रमाणे आहे.

रुपये लाखात

| अ.क्र. | तपशिल | सन २००१-२००२ चे सुधारित अंदाज | सन २००२-२००३ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | २६३१३.४० | २९६२९.३३ |
| २ | महसुली खर्च | २५७८७.१२ | २८७९५.९६ |
| ३ | भांडवली जमा | ७६८८६.४२ | ८५१८७.२० |
| ४ | भांडवली खर्च | ५८४२०.४५ | ६९६६५.३६ |

**कार्यक्रम बाब क्र.४ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रकल्प क्षेत्राबाहेर व प्रकल्प क्षेत्रातील सन २००२-२००३ व न्हावा शेवा पाणी पुरवठयाचे दर सुधारित करणे बाबत**

या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात आली. विद्युत दरातील व पाटबंधारे खात्याच्या स्वामीत्व धन आकारातील वाढ तसेच सर्वसाधारण महागाईतील वाढ इत्यादी बाबी विचारात घेऊन सर्वसाधारणपणे सध्याच्या पाणी पुरवठा दरामध्ये साधारणत: १० ते १५ % वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापी प्रत्येक क्षेत्रामध्ये तसेच प्रत्येक बाबी मध्ये होणारी पाण्याची दरवाढ मा.अध्यक्ष महोदय यांना सादर करण्यात येऊन त्यास मान्यता घेण्यात येईल व त्यानंतरच दरवाढ लागू करण्यात यावी असेही ठरविण्यात आले. तसेच गिरीस्थानकांच्या ठिकाणी अ वर्ग व ब वर्ग हॉटेल्स साठी सध्या पाणी पुरवठयाचे जे दरलागू आहेत. तेच ठेवण्यात यावेत असाही निर्णय घेण्यात आला. तसेच सिडको साठी दिनांक १/५/२००० पासुन रुपये ५.८५ प्रति १००० लिटर हाच दर लागू करण्याचा व नावाशेवा योजनेच्या दरात सध्या वाढ न करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.५ :- सन २००१-२००२ मध्ये चालू व नवीन नागरी पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून योजनांअंतर्गत कर्ज उभारणे**

सन २००१-२००२ या वर्षात नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून त्यांच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून रुपये ५५ कोटीचे कर्ज उचलण्यास प्रस्तावानुसार मान्यता देण्यात आली. याबाबतच्या अन्य कागदपत्रांची पुर्तता प्राधिकरणाचे कॉमन सिल वापरुन पुढील सर्व कार्यवाही करण्यास सदस्य सचिव / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना प्राधिकृत कारण्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.६ :- नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी हुडको या वित्तीय संस्थेकडून कर्जाची उभारणी**

नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांसाठी रु. ३२३ कोटी कर्जाचा जो प्रस्ताव नगरपालिका / महानगरपालिकांच्या वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हुडको प्रशासनास सादर केलेला आहे त्याबाबत सर्वकष चर्चा करण्यात येऊन या कर्जउभारणीस मान्यता देण्यात आली याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करुन शासनाची हमी घेणे व कर्जप्राप्त होताच कर्जाचा विनीयोग त्या त्या योजनांस करण्यासाठी मान्यता देण्यात आली. याबाबतच्या अन्य कागदपत्रांची पुर्तता प्राधिकरणाचे कॉमन सिल वापरुन पुढील सर्व कार्यवाही करण्यास सदस्य सचिव / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना प्राधिकृत कारण्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.७ :- नागरी भागाकरिता कमी खर्चाची स्वच्छता योजना सार्वजनिक शौचकुप बांधकाम कार्यक्रमा करीता (पैसे द्या व वापरत तत्वावर ) मौलीक शौचकुप हुडकोकडून कर्ज रु. ५१.०२ लाख आणि अनुदान रु. ८४.५० लाख उभारणीस प्राधिकरणाची मंजुरी मिळणे बाबत (अनुसमर्थनासाठी )**

या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सर्वसाधारपणे चर्चा करण्यात येऊन नागरी भागाकरीता कमी खर्चाच्या स्वच्छता योजने अंतर्गत सार्वजनीक शौचकुप / मौलीक शौचालये या करीता हुडको प्रशासनाकडून कर्जाची उभारणी तसेच शासनाकडून अनुदान उभारण्यास मंजुरी देण्यात आली. याबाबतच्या अन्य कागदपत्रांची पुर्तता प्राधिकरणाचे कॉमन सिल वापरुन पुढील सर्व कार्यवाही करण्यास सदस्य सचिव / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना प्राधिकृत कारण्यास मान्यता देण्यात आली. यापुढे असे प्रस्ताव सादर करत असतांना संमंधीत नगरपालीका /महानगरपालिका कर्ज परतफेडी बाबत दोषी नसल्याची खात्री करण्यात यावी व त्याच नगरपालिकांच्या प्रस्तावांचा विचार व्हावा असेही ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.८ :- अ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन १९९९-२००० या वर्षाचे वार्षिक प्रशासनिक अहवाल व वार्षिक लेखा परिक्षण अहवलास मान्यता देणे (अनुसमर्थनासाठी )**

या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली या कार्यक्रम बाबीस पूर्वीच मान्यता देण्यात आलेली होती. त्यामुळे अनुसमर्थनार्थ सादर झालेल्या प्रस्तावास रितसर मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

उपरोक्त चर्चेअंती सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपविण्यात आली